महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id - collector.pune@maharashtra.gov.in

वाचले : -1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
2. भारतीय साथरोग अधिनियम 1897
3. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांचेकडील अधिसूचना क्र.DMU/2020.CR.92/DisM-1, दिनांक 31 मे, 2020
4. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 25/06/2020

जिल्हाधिकारी पुणे

क्र.जि.आ.व्य/कावि/1838/2020
पुणे दिनांक 26 / 06 / 2020

विषय: कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनाच्या अनुषंगाने केशकर्तनालय दुकाने, स्पा, सलुन, ब्युटी पार्लर चालू ठेवण्यासाठी परवानगी बाबत.

आदेश,

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक 4 वरील शासनाचे आदेश दिनांक 25/06/2020 अन्वये केशकर्तनालय दुकाने, स्पा, सलुन, ब्युटी पार्लर चालू ठेवण्यासाठी अटी व शर्तीचे अधीन परवानगी दिली आहे .

त्याअर्थी, मी नवल किशोर राम, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897 अन्वये पुणे **जिल्हा ग्रामीण क्षेत्रात, नगरपंचायत, नगर पालिका, नगर परिषद, ग्रामपंचायत, तसेच छावणी परिषद हद्दीतील प्रतिबंधित क्षेत्र वगळता इतर क्षेत्रामध्ये** केशकर्तनालय दुकाने, स्पा, सलुन, ब्युटी पार्लर चालू ठेवण्यासाठी खालील अटी व शर्तीचे अधीन राहून दिनांक 28/06/2020 पासून पुढील आदेशा पावेतो सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 पर्यंत चालू ठेवण्यास परवानगी देत आहे.

1. केवळ निवडक सेवा जसे की केस कापने , केसाला रंग देणे, वॅक्सींग , थ्रेडिंग इत्यादीला परवानगी असेल परंतू त्वचेशी संबंधित सेवांना सध्या परवानगी नाही सदर बाबी दुकानात स्पष्टपणे दर्शविल्या जाव्यात
2. कर्मचा-यांनी हातमोजे, अॅप्रॉन आणि मास्क, सॅनिटायझर इ. चा समावेश असलेले संरक्षक साधने वापरणे आवश्यक आहे.
3. प्रत्येक सेवेनंतर खुर्ची स्वच्छ / निर्जतूक करणे आवश्यक आहे. तसेच दुकानातील संपुर्ण क्षेत्र आणि जमिन / पृष्ठभाग / फरशी प्रत्येक 2 तासांनी स्वच्छ व निर्जतूक करण्यात यावेत.
4. टॉवेल्स, नॅपकिन्स यांचा वापर झाल्यानंतर त्याची विल्हेवाट लावता येईल अशा प्रकारच्या (Disposable) टॉवेल्स, नॅपकिन्सचा वापर करण्यात यावा. तसेच वापरुन झाल्यावर विल्हेवाट न लावता येण्याजोग्या (Non Disposable ) उपकरणांचे प्रत्येक सेवेनंतर स्वच्छ आणि निर्जतूकीकरण करावे .
5. सेवा देणारा व सेवा घेणारा सोडून इतर व्यक्तीमध्ये 03 फुटाचे अंतर ठेवणे बंधनकारक राहील.
6. मास्क, रूमाल नाका तोंडाला झाकुन ठेवील अशा प्रकारचे असणे आवश्यक आहे. तसेच दुकानामध्ये सॅनिटायझर, हॅन्डवॉश, साबण, व इतर हात धुण्याचे साहित्य ठेवणे बंधनकारक राहील.
7. ग्राहकांना केवळ Appointment घेऊनच येण्यास कळवावे व ग्राहक विनाकारण दुकानामध्ये वाट पाहत राहणार नाही याची सलुन मालकांनी दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner

8. प्रत्येक दुकानदारांनी ग्राहकांनी वरिल प्रमाणे घ्यावयाच्या दक्षतेबाबतची माहिती दुकानाच्या दर्शनी भागात ठळक स्वरुपात लावण्यात यावी.
9. वरील अटींचे उल्लघन केल्यास दंडात्मक व कायदेशिर कार्यवाही करुन दिलेली मुभा रद्द करण्यात येईल.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 आणि भारतीय दंड संहिता 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल .

हे आदेश दि. 26/06/2020 रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी पुणे

सही/- xxx
( नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,

प्रति-

1. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे
3. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण
4. सर्व उपविभागीय दंडाधिकारी पुणे जिल्हा
5. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
6. जिल्हा माहिती अधिकारी पुणे यांना व्यापक प्रसिध्दीसाठी.

प्रत- मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे माहितीसाठी सविनय सादर

( डॉ. जयश्री कटारे)
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे,

Scanned with CamScanner